# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक २३१/२०२४** **दिनांक-२१/०६/२०२४**

## Electricity Bill तात्काळ भरण्याचे सांगून फसवणूक करण्यात आलेल्या रक्कमेमधील ८०,०००/- रुपये परत मिळविण्यात यश - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी !!!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत तुळींज पोलीस ठाणेचे हद्दीत राहणारे इसम नामे श्री. मुकेश यांचे मोबाईलवर मॅसेज प्राप्त झाला की, "*तुमचे इलेक्ट्रीसिटी बिल भरलेले नाही तरी बिल भरणा न केल्यास तूमचे विज कनेक्शन कट करण्यात येईल.* तक्रारदार यांनी तात्काळ लाईट बिल भरतो असे सांगितले असता त्यांना त्यांचे मोबाईलवर एक लिंक पाठवुन त्यात त्यांची माहिती भरुन ऑनलाईन पेमेंट करण्यास सांगितले. तक्रारदार यांनी लिंक ओपन करुन त्यात आवश्यक ती माहिती भरली असता काही वेळानंतर त्यांचे बँक खात्यातुन ८०,०००/- रु कपात झाल्याचा मॅसेज त्यांचे मोबाईलवर प्राप्त झाला.

त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची फसवणुक झाल्याबाबत सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारी अर्ज दिला होता.

**(सायबर गुन्हे कक्ष आवक अर्ज क्रमांक २२१४-बी/२०२३ दिनांक १९/०९/२०२३ अन्वये चौकशीकामी प्राप्त झाला.)**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. प्राप्त माहितीचे अवलोकन केले असता तक्रारदार यांचे फसवणूक झालेली रक्कम ऑनलाईन **AMAZON PAY** वॉलेट च्या माध्यमातुन पुढे वळती करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले. नमूद पेमेंट गेटवे सोबत पत्रव्यवहार व पाठपूरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली **रक्कम ८०,०००/- रुपये** पुन्हा तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

**अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...**

- **बँक/क्रेडीट कार्ड बँक कोणत्याही प्रकारे ग्राहकांना एसएमएस किंवा फोनवर संपर्क साधून वैयक्तिक गोपनीय माहिती विचारणा करत नाही.**
- **अनोळखी मोबाईल धारकास आपली गोपनीय माहिती उघड करु नये. समक्ष बँकेत जावुन आपल्या अडचणीचे निरसन करून घ्यावे.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती उघड करू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करू नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/ स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर मपोअं/पल्लवी निकम, मपोअं/स्नेहल पुणे, पोअं/ओमकार डोंगरे, मसुब/प्रविण सांवत व मसुब/सोनाली मोरे यांनी पार पाडली आहे.


सायबर पोलीस ठाणे व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
सायबर पोलीस ठाणे ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**